**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, NOV-DEC 2017, VOL- 4/37*

# इतर मागासवर्गीय आणि जनगणना

माधुरी अनंतराव भामरे, टिळक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे–४११०३०

---

## १. प्रस्तावना

जनगणना म्हणजे एका ठराविक कालावधीत विशिष्ट प्रदेशातील लोकसंख्येची करण्यात येणारी मोजणी होय. एका ठराविक लोकसंख्येची माहिती पध्दतशीरपणे संकलित करून नोंद ठेवण्याची एक पध्दतशीर प्रक्रिया म्हणज जनगणना होय. जनगणना साधारणपणे प्रत्येक दहा वर्षांनी केली जाते. भारतात आधुनिक पध्दतीने व पध्दतशीरपणे जनगणनेला सुरूवात १८६५ आणि १८७२ या वर्षांमध्ये भारतातील काही प्रदेशामध्ये झाली.

१९७२ हा जनगणनेचा प्रयत्न भारतातील पहिली जनगणना म्हणून समजला जातो. त्यानंतर १९८१ चा दुसरी जनगणना झाली. अशा प्रकारे दर दहा वर्षांनी भारतात जनगणना केली जाते. २०११ मध्ये जनगणना भारतातील १५ वी जनगणना होती. सन २०१२ मध्ये होणारी जनगणना ही १६ वी जनगणना असेल.

जनगणनेव्दारे लोकसंख्येची अतिशय महत्वाची गुणवैशिष्टयांची (Population Characteristic) माहिती प्राप्त होते. या माहितीमध्ये आर्थिक कार्यक्रम, साक्षरता व शिक्षण, निवारा आणि घरगुती साधने, शहरीकरण, जननदर व मृत्यूदर, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, भाषा, धर्म, स्थलांतर, अक्षमता आणि लोकसंख्येविषयी इतर सामाजिक व सांस्कृतिक माहितीचा समावेश होतो. जनगणनेव्दारे प्राप्त माहिती देशातील लोकसंख्येबाबतचा महत्वाचा एकमेव प्राथमिक स्त्रोत समजला जातो.

या जनगणनेव्दारे प्राप्त माहितीमुळे लोकसंख्येतील विविध घटकांची सद्यस्थिती कळते व या माहितीचा उपयोग नियोजन व धोरण निश्चितीसाठी केला जातो. राज्य व राष्ट्रीय पातळवरील विकास योजनाचे नियोजन व धोरण ठरविण्यासाठी केला जातो.

## २. भारतातील जातीनिहाय जनगणना :

१८७२ पासून भारतात जनगणना सुरू झाली. भारतात १९३१ या वर्षी शेवटची सर्व जातीनिहाय जनगणना झाली. त्यानंतर ती बंद करण्यात आली. १९५१ पासून फक्त अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची जातीनिहाय जनगणना केली जाते आणि त्यानुसार दरवर्षी त्यांच्या विकासासाठी राज्य व राष्ट्रीय अर्थसंकल्पात त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी राखून ठेवला जातो. (हरी नरके – ओबीसी राजकारण)

## ३. १९३१ ची जनगणना व इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या:

१९३१ च्या शेवटच्या सर्व जातनिहाय या जनगणनेच्या आधारे मंडल आयोगाने जातीनिहाय व धार्मिक प्रतिनिधीत्वाचा तपशील तयार केला व त्यानुसार इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या ५२ टक्के एवढी होती.

**कोष्टक क्र १ : भारतातील जाती व धर्मानुसार लोकसंख्येचे प्रमाण**

| अ.क्र. | जाती/धर्माचे नाव | एकूण लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | |
| क–१ | अनुसूचित जाती | १५.०५ |
| क–२ | अनुसूचित जमाती | ७.५१ |
| | **‘क’ एकूण** | **२२.५६** |
| (२) | बिगर हिंदू संप्रदाय, धार्मिक समूह इत्यादी | |
| ख–१ | मुस्लीम (अनुसूचित जमाती सोडून) | ११.१९ |
| ख–२ | ख्रिश्चन (अनुसूचित जमाती सोडून) | २.१६ |
| ख–३ | शीख (अनुसूचित जाती/जमाती सोडून) | १.६७ |
| ख–४ | बौध्द (अनुसूचित जमाती सोडून) | ०.६७ |
| ख–५ | जैन | ०.४७ |
| | **‘ख’ एकूण** | **१६.१६** |
| (३) | प्रगत हिंदू जाती व संप्रदाय | |
| ग–१ | ब्राम्हण (भूमीहार सहित) | ५.५२ |
| ग–२ | राजपूत | ३.९० |
| ग–३ | मराठा | २.२१ |
| ग–४ | जाट | १.०० |
| ग–५ | वैश्य, बनिया, इत्यादी | १.८८ |
| ग–६ | कायस्थ | १.०७ |
| ग–७ | इतर प्रगत हिंदू जाती व समूह | २.०० |
| | ‘ग’ एकूण | १७.५८ |
| | ‘क’, ‘ख’, ‘ग’ ची एकूण बेरीज | ५६.३० |
| | हिंदू मागास जाती व संप्रदाय | |
| | इतर मागासवर्गात येणाऱ्या जाती | ४३.७० |
| | बिगर हिंदू मागासवर्ग | |
| | बिगर हिंदू मागासवर्गीय | ८.४० |
| **एकूण** | **इतर मागासवर्गीय** | **५२.१०** |

**स्त्रोत : मंडल आयोग अहवाल**

**४. इतर मागासवर्गीय लोकसंख्या अंदाज :**

१९३१ च्या शेवटच्या सर्व जातीनिहाय जनगणनेनुसार इतर मागास वर्गीयांची लोकसंख्येची आकडेवारी मंडल आयोगाने १९८८ मध्ये ओबीसींच्या लोकसंख्येचा अंदाज ठरविण्यासाठी वापरली होती. त्यानुसार इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या ५२ टक्के मानली होती. त्यानंतर बऱ्याचवेळा इतर मागासवर्गीयांच्या लोकसंख्येची

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

माहिती उपलब्ध नसल्याने त्यांना आरक्षणाचे योग्य फायदे देणे टाळले जात होते व आजही टाळले जात आहे. इतर मागासवर्गीयांच्या लोकसंख्येचा अचूक अंदाज घेण्यासाठी राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण संस्था, राष्ट्रीय कौटूंबिक आरोग्य संस्था यांच्या अहवालांचा आधार घेण्यात आला आणि त्याची तुलना भारतीय जनगणनेच्या २००१ व २०११ बरोबर करण्यात आली आणि ती खालील कोष्टकात दिली आहे.

**कोष्टक क्र २: भारतातील प्रामाणिक प्रवर्गाच्या लोकसंख्येची तुलना**

| माहितीचे स्त्रोत | एससी | एसटी | ओबीसी | इतर |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण ६१ वी फेरी (२००४—५) | १९.७५ | ८.६१ | ४०.२३ | ३१.४ |
| राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण ६२ वी फेरी (२००५—६) | २०.०२ | ९.१६ | ४०.१७ | ३०.६३ |
| राष्ट्रीय कौटूंबिक आरोग्य सर्वेक्षण III (२००५—६) | १९.७३ | ८.६४ | ४०.६४ | ३०.५१ |
| सरकार सर्वेक्षण २००६—०७ | १९.५९ | ८.६३ | ४०.९४ | ३०.८० |
| भारतीय जनगणना २००१ | १६.२ | ८.२ | — | ७५.६ |
| भारतीय जनगणना २०११ | १६.६ | ८.६ | — | ७४.८ |

*इतर म्हणजे भारतातील सर्वसाधारण प्रवर्गातील इतर मागासवर्गीय प्रवर्गासह जनसंख्या

स्त्रोत : राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण अहवाल ६१ वी फेरी (२००४—०५), राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण अहवाल ६२ वी फेरी (२००५—०६), राष्ट्रीय कौटूंबिक आरोग्य सर्वेक्षण अहवाल **III** (२००५—०६), भारतीय जनगणना २००१, भारतीय जनगणना २०११, टाईम्स ऑफ इंडिया — १ सप्टेंबर २००७

कोष्टक क्र २ वरून असे लक्षात येते की, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २००४—०५, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २००५—०६ आणि राष्ट्रीय कौटूंबिक आरोग्य सर्वेक्षण अहवाल (२००५—०६) एससी प्रवर्गातील लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे १९.७५ टक्के, २०.०२ टक्के आणि १९.७३ टक्के आहे. तसेच २००१ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण १६.२ टक्के आहे व २०११ च्या जनगणनेनुसार १६.६ टक्के आहे म्हणजेच राष्ट्रीय संस्थांचा अंदाज व २००१ व २०११ च्या एससी प्रवर्गाच्या लोकसंख्येमध्ये फार कमी फरक आहे.

हा फरक अनेकविध घटकांमुळे पडला असेल. परंतु राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण फेऱ्या व राष्ट्रीय आरोग्य सर्वेक्षण यांच्यानुसार एससी जनसंख्या व एसटी जनसंख्या यांचे अंदाज अचूक आहेत हीच बाब ओबीसी लोकसंख्येबाबतही लागू होईल. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण फेरी ६१ व ६२, राष्ट्रीय कौटूंबिक आरोग्य सर्वेक्षण अहवाल III (२००५—०६) यांच्या इतर मागासवर्गीयची लोकसंख्या साधारणपणे ४१ टक्के आहे.

मंडल आयोगाच्या मते ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्के आहे तर राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार देशात ओबीसींची लोकसंख्या ४१ टक्के आहे. या तफावतीचे कारण असे आहे की, मंडल आयोगाने ३७४३ जातींची ओबीसी म्हणून मोजदाद केली असली तरी सर्वोच्च न्यायालयाने फक्त १९६३ जातीनांच ओबीसी म्हणून

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मान्यता दिली आहे. मंडल आयोगाच्या शिफारशींना मान्यता देताना सर्वोच्च न्यायालयाने मंडल यादीतील ३७४३ जातींना इतर मागासवर्गीयांमध्ये सरसकट समाविष्ट न करता राज्याच्या यादीत व मंडलच्या यादीत दोन्हीकडे समावेश असणाऱ्या जातींनाच तेवढी ओबीसी म्हणून मान्यता दिली आहे. (इंदिरा सहानी निवाडा १६ नोव्हेंबर १९९२) म्हणजेच त्यातील १९६३ जातींनाच ओबीसी म्हणून मान्यता दिली आहे. गेल्या काही वर्षात या यादीमध्ये सुमारे २०० जातींची भर पडून ही संख्या वाढलेली आहे. तथापि तीही लोकसंख्याही राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणात आलेली नाही.

**५. महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीयांच्या लोकसंख्येचा अंदाज:**

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (६२ वी फेरी) महाराष्ट्रातील इतर मागास वर्गीयांची अंदाजे लोकसंख्या सुमारे ३२ टक्के आहे. १९९४ साली महाराष्ट्रात मंडल आयोग लागू झाला तेव्हा महाराष्ट्राच्या ओबीसी यादीत २०१ जाती असल्या तरी त्यातील २८ जाती वगळण्यात आल्या होत्या. या शिल्लक १७३ जातींच्या यादीत नंतरच्या काळात नव्याने १७३ जातींची भर पडून आज ही संख्या दुप्पट म्हणजे ३४६ झाली आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणात मात्र आधीच्या फक्त १७३ जातीच आलेल्या आहेत.

तसेच महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांची स्वतंत्र सूची असून त्यात असलेल्या आणि विशेष मागासप्रवर्ग या घटकात असलेल्या जाती या सर्वांची एकूण संख्या ४१० वर जाते.

**कोष्टक क्र ३: महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीयाच्या लोकसंख्येचा अंदाज**

| | एससी | एसटी | ओबीसी | इतर |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (६२ वी फेरी) २००५—०६ | १४.६७ | ९.८४ | ३१.७१ | ४३.७८ |
| राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २००६—०७ | १५.६५ | १०.७ | २६.४५ | ४७.२ |
| जनगणना २०११ | १४.६७ | ९.८४ | ३१.७१ | ४३.७८ |

स्त्रोत :राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (६२ वी फेरी) नुसार

**कोष्टक क्र २** वरून भारतात सध्या ओबीसींची लोकसंख्या ४१ ते ५२ टक्के पर्यंत असून महाराष्ट्रात ही लोकसंख्या सुमारे ५२ टक्के आहे. केंद्र सरकारे २०११ च्या जनगणनेमध्ये ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे ठरविले होते. त्यानुसार विना पेपर सर्वेक्षण केले गेले. परंतु अद्याप या ओबीसी जातनिहाय जनगणनेचा अहवाल शासनाने प्रकाशित केला नाही. यामागचे कारण अनाकलनीय आहे. केरळ राज्यात कॉ. नंबुद्रीपाद मुख्यमंत्री असताना राज्य स्तरावर जातनिहाय जनगणना झाली आहे. (श्रावण देवरे — संघर्ष पार्टी) अशा प्रकारची जातनिहाय जनगणना पुरोगामी महाराष्ट्रात २०२१ होईल.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**६.  इतर मागासवर्गीयांच्या जातनिहाय जनगणनेमध्ये गरज व महत्व:**

भारतात लिंगभाव, वर्ग आणि जात ही पक्षपाताची आणि शोषणाची तीन प्रमुख केंद्र आहेत.  इतर मागासवर्गीय हा निर्माणकर्ता समाज आहे. बारबलुतेदार आणि अठरा अलुतेदारांचा बनलेला हा कारू, नारू समाज आहे. यात नानाविध कौशल्यांची जादू असणारे हे लोक ''शुद्र'' गणले जात असले तरी यातील अनेक जाती स्वत:ला उच्च मानत आलेल्या आहेत. भारतीय जातीव्यवस्थेचे ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य हे तीन लाभार्थी आहेत. शुद्र, अतिशुद्र आणि सर्व स्त्रीया या व्यवस्थेचे बळी आहेत. भारतातील लोकांची सामाजिक शैक्षणिक व आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी इंग्रजांनी १८७२ साली जातवार जनगणना सुरू केली. १८८५ साली इंग्रजांनी मुंबई राज्यातील जाती जमातींचा सखोल अभ्यास करण्यासाठी आर. ई. इंथोवेन यांच्याकडे काम सोपविले. त्यांनी ५०० जाती जमातींचा सखोल अभ्यास करून १९२० च्या दशकात त्यांचे तीन खंड प्रकाशित केले.

१९८५ साली स्वतंत्र भारतातील जातीपातींचा समाज शास्त्रीय अभ्यास करण्याचा महाप्रकल्प डॉ. के. एस. सिंग यांच्या नेतृत्वाखाली हातात घेण्यात आला. २००४ साली त्याचे ४३ खंड प्रसिध्द करण्यात आले. या संशोधनानुसार भारतात आज ४६३५ जाती जमाती असल्याचे पुढे आले आहे. त्यात प्रामुख्याने चार मोठे गट आहेत. अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), विमुक्त आणि भटक्या जाती (व्हीजेएनटी) आणि इतर मागासवर्ग (ओबीसी) जनगणना म्हणजे केवळ शीरगणती नव्हे. जनगणनेतून समाजातील प्रत्येक घटकाची माहिती मिळते. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात विविध जातींची काय स्थिती आहे याची आकडेवारी मिळते व त्या आाधारे त्या जातींसाठी विशेष कार्यक्रम राबवून त्यांची प्रगती साधली जाते.

**संदर्भ**

१) फडके, य. दि. (२००६) राखीव जागांचे शंभर वर्षे, पुणे सुगावा प्रकाशन.
२) देवरे श्रावण, (२००८), मराठा समाजाचे ओबीसीकरण आणि जातीअंताचे धोरण, पुणे, सुगावा प्रकाशन.
३) बुटे, नंदू (२०१०), ओबीसी समाज : समस्या व उपाय, पुणे जिजाई प्रकाशन.
४) देवरे, श्रावण (२०१२) ओबीसींच्या संघर्ष वाटा, पुणे सुगावा प्रकाशन.
५) आंबेडकर, बाबासाहेब (२०१४), जातिप्रथेचे विध्वंसन, पुणे सुगावा प्रकाशन.
६) वाघमारे, वसंत (२०१४) जातिव्यवस्था : निर्मिती आणि स्वरूप पुणे, सुगावा प्रकाशन.
७) कांबळे, उत्तम (२०१५), ओबीसीचे राजकारण, मुंबई, लोकवाङ्मय गृह.
८) गायकवाड, प्रदीप (२०१५), मागासवर्गीयांच्या विकास योजना, नागपूर, संत प्रकाशन.
९) थोरात, सुखदेव (२०१५), डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक बहिष्कृतता व समावेशकता धोरणाविषयीचा दृष्टिकोन, पुणे, सुगावा प्रकाशन.
१०) थोरात, सुखदेव (२०१६), आरक्षण धोरणाबाबत गैरसमज : कसे व का? पुणे, सुगावा प्रकाशन.
११) भणगे, रविंद्र (२०१६), आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*